D/Prasad२०२०/manai aadesh.२०

**वा च ले :-**

१.फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
२.आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
३. भारत हवामान विभाग, नवी दिल्ली यांचेकडील पत्र दि.०१/०६/२०२०.
४.मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दि.०१/०६/२०२०.

---

जिल्हा दंडाधिकारी पालघर जिल्हा पालघर

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/चक्रीवादळ/एस.आर. क्र.२७/२०२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दि.०२/०६/२०२०.

## सुधारित आदेश

ज्याअर्थी भारतीय हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानुसार निसर्ग चक्रीवादळामुळे दि.०३/०६/२०२० रोजी पालघर जिल्हयातील समुद्रकाठी असलेल्या वसई, पालघर, डहाणू तालुक्यामध्ये हानी होण्याची शक्यता असून अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे. या पाश्वभुमीचा विचार करता पालघर जिल्हयातील वसई, पालघर, डहाणू तालुक्याच्या किनारपट्टीवर राहणाऱ्या लोकांची सुरक्षा अबाधित रहावी व कोणत्याही प्रकारची जिवीतहानी होऊ नये म्हणून प्रतिबंधांत्मक आदेश लागू करणे गरजेचे आहे.

त्याअर्थी मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ (C) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पालघर जिल्हयाच्या वसई, पालघर, डहाणू तालुक्यातील सर्व उद्योग, उद्योग आस्थापना, सर्व दुकाने, खाजगी आस्थापना **बंद** ठेवण्याचे आदेश देत आहे. तसेच चक्रीवादळाच्या अनुषंगाने औद्योगिक आस्थापनांनी कारखान्यांच्या सुरक्षिततेचा उपाय म्हणून Safe Shut Down बाबत योग्य ती दक्षता घ्यावी व त्यामधून कोणतेही रसायन अथवा वायु यांचे उत्सर्जन होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. तथापी सदर तालुक्यातील अत्यावश्यक सेवा व दुकाने अत्यल्प मनुष्यबळावर चालू राहतील.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१ (b) नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दि.०२/०६/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/---**
**(डॉ.कैलास बा.शिंदे)**
**जिल्हादंडाधिकारी तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत:-**

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी वआवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहितीसाठी वआवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) स्थल निर्देशक, तारापूर परमाणू विद्युत केंद्र, बोईसर, ता.जि.पालघर यांना माहितीसाठी वआवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
६) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.